नि. फौ. ख. क्र.७३/२०२२ निशाणी क्र.४५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

नाव – गोरख सटवाजी शेंद्रे

वय – ३९ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – परडी माटेगांव, ता. वडवणी, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचे मार्फत सरतपास दु.१२.१९ वा. सुरुः**

१. घटना दि.२५.०९.२०२२ रोजी सकाळी ७.०० वाजता लक्ष्मण आणि महेश यांच्या घरासमोर घडली आहे. आरोपी आणि फिर्यादी यांच्यामध्ये रस्त्याच्या कारणावरुन वाद झाला होता. त्यावेळी मी माझ्या घरातुन भांडण सोडविण्यासाठी बाहेर आलो असता महेश हा लक्ष्मण यांना डोक्यामध्ये हातोडा मारीत असताना मी पाहिले. सर्व आरोपी हे फिर्यादीला शिवीगाळ करीत होते. डोक्यात हातोडा मारल्यामुळे लक्ष्मण यांच्या डोक्यातुन रक्त निघाले होते. सदर भांडण मी स्वतः सोडविले. त्यानंतर फिर्यादी हे दवाखान्यात गेले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केलेली आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. सर्व आरोपी आज रोजी न्याय कक्षात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. कदम यांच्या मार्फत**

२. माझे शिक्षण इ.७ वी पर्यंत झालेले आहे. मी घराबाहेर आलो त्यावेळी सर्व आरोपी आणि फिर्यादी यांच्या व्यतिरीक्त इतर व्यक्ती कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सर्व आरोपी हे शेती करतात. मी भांडणाच्या ठिकाणी आल्यानंतर त्या ठिकाणी इतर अंदाजे दहा ते पंधरा लोक जमले होते. जमलेले सर्व लोक आरोपी आणि फिर्यादी यांच्याच वाड्यातील होते. बाहेरचे कोणीही लोक त्या ठिकाणी जमले नव्हते.

३. पोलीस आमच्या गावामध्ये कधी आले हे मला माहिती नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला नाही, पोलीसांनी मनानेच माझे नाव टाकले आहे. हे म्हणणे खरे नाही

की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दु.१२.३३ वा. पुर्ण

फेरतपास नाही.

**दिनांक – १२/०३/२०२६.**

| | |
|---|---|
| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
| sd/- | sd/- |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **वडवणी, जि. बीड.** | **वडवणी, जि. बीड.** |